# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. २४/११/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १६८०**

सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. ४) च्या माहे ऑक्टोंबर २०१६ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांचे जा.क्र. सह मआ–४/९०१ दि.९/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६८१**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ चा माहे ऑक्टोंबर २०१६ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ यांचे जा.क्र. उप–२/१२३३ दि. ११/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६८२**

पुणे महानगरपालिका उप आयुक्त (परिमंडळ १) च्या ऑक्टोंबर २०१६ च्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआप १/७५९ दि.१७/११/२०१६ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १६८३**

मा.विकास दांगट व मा.सौ.संगिता कुदळे यांचे दि.१६/११/२०१६ चे पत्र.

सिंहगड रोडवरील वडगांव बु.उड्डाण पुलाखाली जुनी स्मशानभूमी आहे. सिंहगडरोडवर नागरीकरण झपाट्याने होत असल्यामुळे स्मशानभूमी मध्ये दशक्रिया विधीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्यामुळे सध्याची स्मशानभूमी मधील दशक्रियाची जागा अपुरी पडत आहे. वडगांव बु. स्मशानभूमी लगत स.नं.६१ पार्ट व २८ पार्ट याठिकाणी पाटबंधारे विभागाची जागा असून या जागेवर विकास आराखड्यामध्ये म्युन्सीपल पर्पज ( एमपी ०८) आरक्षण आहे. सदर जागा स्मशानभूमी लगत असल्यामुळे या जागेचा वापर होवू शकेल .

तरी सदर जागा दशक्रिया विधी घाटासाठी पाटबंधारे विभागाकडून घेण्यात यावी व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी .

**विषय क्र. १६८४**

मा.विकास दांगट व मा.सौ.संगिता कुदळे यांचे दि.१६/११/२०१६ चे पत्र.

सिंहगड रोडवरील वडगांव बु.फनटाईम सिनेमा ते १८ मीटर डी.पी.रोडवरील कॅनॉलवर बांधण्यात येणाऱ्या नवीन पूल दरम्यान स.नं.२९ पार्ट व ३० पार्ट वडगांव बु. येथील दोन कॅनॉल मधील जागा पाटबांधारे विभागाची आहे. या जागेचे अंदाजे क्षेत्रफळ ३००० चौ.मीटर असून सदर जागेवर ओटा मार्केट विकसित केल्यास सिंहगड रोडवरील भाजीपाला व फळविक्रेते यांचे पुर्नवसन करणे महानगरपालिकेस शक्य होणार आहे.

तरी सदर जागा ओटा मार्केट विकसित करण्यासाठी पाटबंधारे विभागाकडून घेण्यात यावी व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी .

**विषय क्र. १६८५**

मा.गणेश बिडकर यांचे दि.१६/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३९ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २० लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, बजेट कोड ZE16A104/SP2-165 प्रभाग क्र. ३९ ब विजय मंडळ सोमवार पेठ ते ८९ सोमवार पेठ येथे ६ इंची पाण्याची लाईन टाकणे. | २० लाख | --- |
| | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. ३९ ब मध्ये सोमवार पेठ परिसरात १० इंची, १२ इंची ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र. ३९ ब मध्ये रास्ता पेठ परिसरात १० इंची, १२ इंची ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १६८६**

सह महापालिका आयुक्त, विभागीय कार्यालय क्र. ४ कार्यालयाकडील माहे ऑक्टोंबर २०१६ ची महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/सहमआ-४/७५६ दि.१६/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६८७**

उप आयुक्त, (परिमंडळ १) पुणे महानगरपालिका अधिनिस्त महा.सहा.आयुक्त, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील दि. १/९/२०१६ ते दि. ३०/९/२०१६ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआप१/७५७ दि.१६/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६८८**

सह आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. २) कार्यालयाकडील माहे ऑक्टोंबर २०१६ ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उप-२/७५८ दि.१६/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६८९**

उप आयुक्त, (परिमंडळ १) पुणे महानगरपालिका अधिनिस्त महा.सहा.आयुक्त, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील दि. १/१०/२०१६ ते दि. ३१/१०/२०१६ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआप१/९२४ दि.१८/११/२०१६ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १६९०**

मा.कार्यकारी अभियंता कार्यालय (बांधकाम झोन क्र. ५) हडपसर विभागाकडील कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१८२ दि. ७/७/२०१४ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १७ सन २०१४-२०१५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/७५४ दि.१६/११/२०१६ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १६९१**

श्री.कुणाल कुमार, भा.प्र.से. महापालिका आयुक्त दि. १५ ते १७ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत बार्सिलोना, स्पेन येथे आयोजित केलेल्या “Make in India Pavilion-Smart Expo World Congress-Conference & Exhibition 2016” या कार्यशाळेस उपस्थित राहत असल्याबाबतची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआ/साप्र/७५२ दि.१५/११/२०१६ चे पत्र.

## संकिर्ण

**विषय क्र. १६९२**

पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्रापर्यंत २२०० मिमी व्यासाची पोलादी जलवाहिनी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या गोळीबार मैदानाच्या जागेतून टाकणेस परवानगी मिळणेकामी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे पाण्याचे बिलाचे थकीत रक्कमेतून गोळीबार मैदानामधून २२०० मिमी व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकणेकरीता आकारण्यात आलेल्या रस्ता खोदाई शुल्काची रक्कम रुपये ४,०९,५००/– समायोजित करणेस व त्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांना कळविणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/लपापु/७४६ दि.१०/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १६९३**

मिळकत कर थकबाकी वसुली अभय योजना जाहीर करणेसाठी खालील बाबी निदर्शनास आणणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/७५३ दि.१६/११/२०१६ चे पत्र.

१) मिळकतकराची थकबाकी वसूल करणेसाठी थकबाकी असलेल्या सर्व मिळकतीवरील मिळकत धारकांनी एकरकमी संपूर्ण रक्कम थकबाकीसह माहे ५ ऑक्टोंबर २०१६ ते १५ नोव्हेंबर २०१६ अखेर कालावधी दरम्यान भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रकमेच्या ७५% शास्ती रक्कमेस माफी देणेचा कालावधी हा १५ नोव्हेंबर २०१६ ऐवजी ३० नोव्हेंबर २०१६ अखेर ठेवणेत आलेला आहे.

२) जे मिळकतदार १६ नोव्हेंबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ या कालावधीत थकबाकी असलेल्या मिळकतीवरील संपूर्ण रक्कम, एकरकमी थकबाकीसह भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत त्यांना आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रकमेच्या ५०% शास्ती रक्कमेस माफी देणेचा कालावधी हा १६ नोव्हेंबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ अखेर ठेवणेत आलेला आहे.

३) मोबाईल टॉवरचे थकबाकीदार या योजनेतून वगळणेत आलेला आहे.

**विषय क्र. १६९४**

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये म.न.पा.च्या मोकळ्या जागांवर **शेतकरी आठवडे बाजार** भरविणेबाबतचे म.न.पा. धोरण निश्चित करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/७५५ दि.१६/११/२०१६ चे पत्र.

१. दि.२४ ऑगस्ट २०१६ रोजीचे शासन परिपत्रका अन्वये पुणे महानगरपालिकेस कळविलेनुसार शासन निर्णय क्र.कृपमं-०८१६/प्र.क्र.११९/२१ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, दि. १२ ऑगस्ट २०१६ चे निर्णयानुसार **संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आवठडेबाजार अभियान** राबविणेकरीता महाराष्ट्र कृषी पणन मंडळ, पुणे यांना त्यांचे मागणीनुसार आठवड्यातील एका दिवसाकरीता नमूद वेळेत शेतकरी आठवडे बाजार भरविणेस काही अटी/शर्तीवर व मान्य भूईभाडे आकारुन महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा भाडे कराराने देण्यास तत्वत: मान्यता मिळणेस.

२. महानगरपालिकेच्या मिळकत वाटप नियमावली-२००८ मधील तरतुदीनुसार शासनाच्या या उपक्रमास द्यावयाच्या म.न.पा.च्या मोकळ्या जागांचे दैनिक भूईभाडे जास्तीचे होणार असल्याने, अशा जागांवरील शेतकरी आठवडे बाजारांकरीता आठवड्यातील एका दिवसास ५ तासाकरीता १०'x१०' मापाचे स्टॉल जागेस दि. ०३/०९/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. अपर मुख्य सचिव (पणन)-महाराष्ट्र शासन यांनी सुचविलेनुसार प्रत्येकी रूपये १००/- प्रतिदिवस आकारून त्यानुसार वसूली करणेस, तसेच प्रति गाळ्यास सुरूवातीस रूपये १०००/- प्रमाणे अनामत रक्कम स्विकारणे याबबींना मान्यता मिळणेस.

३. शासन निर्णय क्र.कृपमं-०८१६/प्र.क्र.११९/२१ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, दि. १२ ऑगस्ट २०१६ चे मधील तरतुदी व परिशिष्ट अ मधील नियमावलीनुसार कृषी पणन मंडळास (समन्वयक संस्था) म.न.पा.च्या मोकळ्या जागा भूईभाड्याने देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या **शेतकरी आठवडेबाजार महापालिका धोरण-२०१६** चे धोरणास मान्यता घेणेस.

४. वरिल नमूद दरांना व **शेतकरी आठवडेबाजार महापालिका धोरण-२०१६** चे धोरणास महानगरपालिकेची मान्यता मिळाल्यास, मान्यता दिनांकापासून धोरणामधील नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यामधील अटी/शर्ती व नियमानुसार महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ, पुणे यांना शेतकरी आठवडे बाजार भरविणेकरीता म.न.पा. मालकीच्या मोकळ्या जागा भाडेकराराने देण्याची कार्यवाही संबंधीत विभागांकडून त्वरीत चालू करणेस.

५. म.न.पा.च्या मान्य मोकळ्या जागांवर कृषि पणन मंडळामार्फत आठवडे बाजार भरविल्यानंतर त्याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद-विवाद अथवा कायदेशीर बाबींच्या अडचणी निर्माण झाल्यास, अशा प्रकरणी योग्य तो प्रशासकीय निर्णय घेण्याचा किंवा सदर जागेचा भाडेकरार रद्द करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देणेस मान्यता मिळणेस.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)